# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद


कार्यालय दुरध्वनी : २४०३१२२,
कुलसचिव : (कार्यालय) २४०३३३४
(निवास) २४००२०३
फॅक्स : ०२४०-२४०३२२४
तार : बामुसिटी
Web Site : WWW.bamu.net
E-Mail : Bamuaur@vsnl.net.in

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१००४(महाराष्ट्र)


**संदर्भ क्र.: पी.जी./पीएच.डी./२०१२/1507** **दिनांक : ९-५-२०१२**

## सुचना

पीएच.डी. नांव नोंदणीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया विद्यापीठ संकेतस्थळावरील सुचना दि. १-५-२०१२ आणि दि. ३-५-२०१२ द्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत.

शिक्षणशास्त्र विषयाची गुणवत्ता यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. ९/५/२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**संचालक,**
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ.

## संशोधक विद्यार्थ्यांसाठी सुचना

१. संशोधक विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्या मध्ये मान्यता प्राप्त संशोधन मार्गदर्शकांपैकी एका मार्गदर्शकाची स्विकृती घ्यावी .

२. संशोधक विद्यार्थ्याने सादरी करणा दरम्यान संशोधन आणि मान्यता समितीने केलेल्या सुचने प्रमाणे स्विकृत मार्गदर्शकाच्या मदतीने संशोधन आराखडा दुरुस्त करुन पीएच.डी. विभागास सादर करावा.

३. संशोधक विद्यार्थ्याने संशोधन मार्गदर्शकांचे स्विकृती पत्र व दुरुस्त केलेला संशोधन आराखडा (१५ प्रती)संशोधन मार्गदर्शकांच्या व विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीने पीएच.डी. विभागामध्ये **२१ मे २०१२** पर्यंत सादर करावा.

४. विद्यापीठाच्या संकेत स्थळावर विषयनिहाय संशोधन मार्गदर्शकांची यादी व त्यांच्याकडील रिक्त जागांची माहिति उपलब्ध आहे.

## संशोधन मार्गदर्शकांसाठी सुचना

१. संशोधन मार्गदर्शकाने विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांनाच स्विकृती पत्र द्यावे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे विद्यापीठाने स्विकारलेले आरक्षण धोरण संशोधन मार्गदर्शकास बंधनकारक राहील.

३. संशोधन मार्गदर्शक व विद्यार्थी यांनी संशोधन आराखडयात केलेल्या बदलास संशोधन व मान्यता समितीची मान्यता घ्यावी.

४. संशोधन मार्गदर्शकाने आपल्याकडे रिक्त असलेल्या जागेबाबत विद्यापीठाच्या पदव्युत्तर/ पीएच.डी. विभागातून खात्री करून घेऊन विद्यार्थ्यांस स्विकृती पत्र द्यावे.

५. संशोधन मार्गदर्शकास विद्यापीठाचे पीएच.डी. विषयक परिनियम, आदेश, नियम व विनियम पाळणे बंधनकारक आहे.